आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,
जुने जकात घर ,दुसरा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ०२३.

विषयः शुध्द / अतिशुध्द मद्यार्काची निर्यात करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

वाचा- १) या कार्यालायाचे परिपत्रक क्र. एफएलआर ११२००० / ४७२०५ / ५-ब, दि. २३-०४-२००१.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिवायएस ११२००५ / मद्यार्क निर्यात / चार, दि. २०-०६-२००५.

## परिपत्रक

क्रमांक: डिवायएस ११२००५/ मद्यार्क निर्यात/चार मुंबई, दिनांक १७ जुलै, २०११.

१. संदर्भीय परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार गोवा, मध्यप्रदेश व दमण या राज्यांना निर्यात केलेल्या मळी / मद्यार्कापासून मद्य तयार करुन ते अवैध मार्गाने महाराष्ट्रात पाठविल्याच्या घटना यापूर्वी निदर्शनास आलेल्या आहेत. सदर प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये व राज्याचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन या राज्यातील घटकांना होणा-या निर्यातीवर पुन्हा नियंत्रण आणणे आवश्यक झाले होते. या विभागाकडे असलेला अपुरा जवान संवर्ग, मात्र पथरक्षणा अभावी होणारी वाहतुक ही मद्यार्कांच्या दुरुपयोगास कारणीभूत ठरल्यामुळे या कार्यालयाच्या वर नमुद केलेल्या परिपत्रकान्वये गोवा, मध्यप्रदेश व दमण या राज्यातील घटकांना पेय मद्यासाठी मद्यार्काची (RS/ENA) निर्यात करण्याबाबतचे निर्देश / सुचना व अधिकार निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार गोवा, मध्यप्रदेश व दमण या राज्यातील सर्व घटकांना मद्यार्काची निर्यात करण्यापूर्वी आयुक्त कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. आता या परिपत्रका अन्वये गोवा, मध्यप्रदेश व दमण राज्यात करावयाच्या मद्यार्काच्या निर्यातीसाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१ महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २१ नुसार आयात परवाना / ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२ महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २२ नुसार "जी" नमुन्यातील अर्ज योग्य रित्या घटकाने सादर करणे आवश्यक आहे.

३ या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एफएलआर ११२००० / ४७२०५ / ५-ब, दि.२३-०४-२००१, अन्वये सादर करण्यात आलेल्या आयात परवाने व ना-हरकत प्रमाणपत्रांची सत्यता पडताळणी अधीक्षकांनी स्वतः दुरध्वनीद्वारे किंवा लेखी स्वरुपात करुन त्याबाबतचा उल्लेख अहवालामध्ये करणे आवश्यक आहे.

४ महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २५ नुसार, घटकाकडे मागील ३ महिन्यापुर्वीच्या मद्यार्क निर्यातीच्या इ.व्ही.सी. (Certificate C) प्राप्त असणे आवश्यक आहे.

तसेच ३ महिन्याच्या कालावधीत मागील निर्यातीच्या वेळी टँकरसोबत नियुक्त करण्यात आलेल्या पथरक्षक जवानाने, आयातदार घटकाकडे मद्यार्क प्राप्त झाल्याबाबतची पोहोच (निर्यात पास भाग-IV) सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची पूर्तता केल्याबाबत अधीक्षक / प्रभारी अधिकारी यांनी अहवालात नमुद करणे आवश्यक आहे.

५ महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २३ (१) नुसार घटकाकडुन फॉर्म "एच" बंधपत्र प्राप्त करुन घेऊन त्यामध्ये नमुद केलेली अनामत रक्कम योग्य असल्याची खात्री करुन तसे अहवालात नमुद करण्यात यावे.

६. निर्यातदार घटकाकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाची कोणतीही थकबाकी आहे किंवा कसे याबाबत अधीक्षकांनी स्पष्टपणे अहवालात नमुद करणे आवश्यक आहे.

७. आयातदार घटकावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने संबधित जिल्हयात कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविला आहे किंवा कसे याबाबत खात्री करुन त्याबाबत अधीक्षकांनी अभिप्राय सादर करावेत.

८. जिल्हाधिकारी / अधीक्षक यांना आणखी एखाद्या मुद्दयावर काही सुचित करावयाचे असल्यास त्याबाबत अहवालात नमुद करावे.

२. मद्यार्काची (RS/ENA) निर्यात करण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता घटकाकडुन झाल्यानंतर पूर्वपरवानगीसाठी आयुक्त कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात यावेत. प्रस्ताव सादर करतांना सोबतची तपासणी सुची पुर्ण भरुन त्यावर अधीक्षकांनी स्वत: स्वाक्षरी करावी. पूर्वपरवानगी प्राप्त झाल्यानंतर निर्यात करावयाच्या मद्यार्कासाठीचे (RS/ENA) आवश्यक ते शुल्क घटकाकडुन वसुल करण्यात यावे.

३. गोवा, मध्यप्रदेश व दमण या राज्यात होणा-या मद्यार्काच्या निर्यातीसाठी पथरक्षण अंतिम गंतव्य स्थळापर्यंत राहिल.

सदर परिपत्रकाची पोच द्यावी.

( डॉ. संजय मुखर्जी )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रति.

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह.
२. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
३. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
५. सर्व प्रभारी अधिकारी, सर्व आसवन्या.
६. कार्यालय अधीक्षक, कार्यासन क्रमांक ११
७. अभिलेख शाखा ( ५ प्रती )

महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत.

**********

गोवा, दमण व मध्यप्रदेश या राज्यातील घटकांना मद्यार्काची निर्यात करण्यासाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांची तपासणी सूची.

| क्र. | आवश्यक बाबी | आहे / नाही. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २१ नुसार आयात परवाना / ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | |
| २ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २२ नुसार "जी" नमुन्यातील अर्ज योग्य रित्या घटकाने सादर केला आहे काय ? व तो योग्य आहे का ? | |
| ३ | या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एफएलआर ११२००० / ४७२०५ / ५-ब, दि.२३-०४-२००१, अन्वये सादर करण्यात आलेल्या आयात परवाने व ना-हरकत प्रमाणपत्रांची सत्यता पडताळणी अधीक्षकांनी <u>स्वतः दूरध्वनीद्वारे</u> किंवा लेखी स्वरुपात करुन त्याबाबतचा उल्लेख अहवालामध्ये करण्यात आला आहे का ? | |
| ४ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २५ नुसार, घटकाकडे मागील ३ महिन्यापुर्वीच्या मद्यार्क निर्यातीच्या इ.व्ही.सी. (Certificate C) प्राप्त आहेत का ? तसेच ३ महिन्याच्या कालावधीत मागील निर्यातीच्या वेळी टँकरसोबत नियुक्त करण्यात आलेल्या पथरक्षक जवानाने, आयातदार घटकाकडे मद्यार्क प्राप्त झाल्याबाबतची पोहोच (निर्यात पास भाग-IV) सादर केली आहे का ? | |
| ५ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २३ (१) नुसार घटकाकडुन फॉर्म "एच" बंधपत्र प्राप्त करुन घेऊन त्यामध्ये नमुद केलेली अनामत रक्कम योग्य असल्याची खात्री केली आहे काय ? | |
| ६ | निर्यातदार घटकाकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाची कोणतीही थकबाकी आहे किंवा कसे ? | |
| ७ | आयातदार घटकावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने संबधित जिल्हयात कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविला आहे किंवा कसे याबाबत खात्री केली आहे काय ? | |
| ८ | जिल्हाधिकारी / अधीक्षक यांना आणखी एखाद्या मुद्दयावर काही सुचित करावयाचे असल्यास त्याबाबत अहवालात नमुद केले आहे काय ? | |

महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत.

**********

गोवा, दमण व मध्यप्रदेश या राज्यातील घटकांना मद्यार्काची निर्यात करण्यासाठी आवश्यक असणा-या कागदपत्रांची तपासणी सूची.

| क्र. | आवश्यक बाबी | आहे / नाही. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २१ नुसार आयात परवाना / ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | |
| २ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २२ नुसार "जी" नमुन्यातील अर्ज योग्य रित्या घटकाने सादर केला आहे काय ? व तो योग्य आहे का ? | |
| ३ | या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एफएलआर ११२००० / ४७२०५ / ५-ब, दि.२३-०४-२००१, अन्वये सादर करण्यात आलेल्या आयात परवाने व ना-हरकत प्रमाणपत्रांची सत्यता पडताळणी अधीक्षकांनी स्वत: दूरध्वनीद्वारे किंवा लेखी स्वरुपात करुन त्याबाबतचा उल्लेख अहवालामध्ये करण्यात आला आहे का ? | |
| ४ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २५ नुसार, घटकाकडे मागील ३ महिन्यापुर्वीच्या मद्यार्क निर्यातीच्या इ.व्ही.सी. (Certificate C) प्राप्त आहेत का ? तसेच ३ महिन्याच्या कालावधीत मागील निर्यातीच्या वेळी टँकरसोबत नियुक्त करण्यात आलेल्या पथरक्षक जवानाने, आयातदार घटकाकडे मद्यार्क प्राप्त झाल्याबाबतची पोहोच (निर्यात पास भाग-IV) सादर केली आहे का ? | |
| ५ | महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात आणि निर्यात), नियमावली १९६३ अंतर्गत नियम २३ (१) नुसार घटकाकडुन फॉर्म "एच" बंधपत्र प्राप्त करुन घेऊन त्यामध्ये नमुद केलेली अनामत रक्कम योग्य असल्याची खात्री केली आहे काय ? | |
| ६ | निर्यातदार घटकाकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाची कोणतीही थकबाकी आहे किंवा कसे ? | |